जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २१ दिनांक - ०८/०१/२०२४**

मुंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## सुमित उर्फ लखन रविंद्र गौड,(टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०२ साथीदार यांचेविरुध्द मकोका अंतर्गत कारवाई

दि.०५/११/२०२३ रोजी रात्री ०७/३० वा.चे सुमारास गोदरेज सोसायटीचे गेट शेजारी,गायरान वस्ती,केशवनगर पुणे येथे फिर्यादी हे त्यांचे मित्रास भेटण्यासाठी गेले होते.सदर वेळी फिर्यादीचे तोंड ओळखीच्या मुलास सिध्दार्थ शावळकर,सुमित गौड व राहुल धावारे असे तिघेजण मारहाण करीत असल्याचे दिसल्याने फिर्यादी हे भांडण सोडविण्यासाठी मध्ये गेले असता,राहुल धावारे याने फिर्यादी यांची गचंडी पकडुन,गळा दाबुन बाजुला ढकलले. सिध्दार्थ शावळकर याने फिर्यादीस खाली पाडुन जोर जोरात लाथा मारल्या.त्यावेळी सुमित गौड याने त्याचे कंबरेला लावलेला पिस्टल काढुन तो पिस्टल उलटया बाजुने फिर्यादीचे डोक्यात जोरात मारला,त्यामुळे डोक्यात जखम होवुन रक्त येत असतांना देखील सुमित गौड याने पिस्टलने फिर्यादीचे डोक्यात जोर जोरात मारुन गंभीर जखमी केले.तसेच सिध्दार्थ शावळकर व राहुल धावारे असे दोघेजण लाथा बुक्यांनी मारहाण करत,शिवीगाळ करत होते.तेव्हा सुमित गौड याने त्याचे जवळील पिस्टल फिर्यादीवर रोखुन,दोनदा मागे पुढे करुन “आमच्या मध्ये पडतो काय,आज तुला तर संपवितोच”असे म्हणाला.तेव्हा तेथे जमलेले लोक भितीमुळे सगळे पळुन गेले. वगैरे मजुकूराची फिर्याद दिल्याने **मुंढवा पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.३६२/२०२३ भादंवि कलम ३०७,३२३,५०४,५०६,३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३),१३५ क्रिमीनल लॉ ॲमेन्डमेंट कलम ३, ७** प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याचे तपासा दरम्यान आरोपी **१)सुमित उर्फ लखन रविंद्र गौड,वय ३२ वर्षे,रा. सोमनाथ नगर,वडगाव-शेरी,पुणे (टोळी प्रमुख) (पाहिजे आरोपी) २)सिद्धार्थ देवीदास शावळकर,वय २१ वर्षे,रा. सिध्दी विनायक कॉलनी,केशवनगर,पुणे ३)राहूल सोमनाथ धावरे,वय २३ वर्षे,रा.साईकृपा सोसायटी, सोमनाथ नगर,वडगाव-शेरी,पुणे (टोळी सदस्य)** यांनी केल्याचे निष्पन्न झालेने **अ.क्र.२ व ३ यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.**

पाहीजे आरोपी सुमित उर्फ लखन रविंद्र गौड (टोळी प्रमुख) व त्याने साथीदारासह बेकायदेशिर मार्गाने स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी गैरवाजवी आर्थिक फायदा व इतर फायदा मिळविण्याच्या उद्देशाने संघटीत गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणून किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे हिंसाचाराचा वापर करुन किंवा हिंसक मार्गाचा अवलंब करुन स्वतःचे व स्वतःच्या टोळीचे वर्चस्व रहावे म्हणुन व अवैद्य मार्गाने आर्थिक फायदा व्हावा या करीता केलेला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पाहीजे आरोपी सुमित उर्फ लखन रविंद्र गौड याने टोळीतील वेगवेगळया साथीदारासह खूनाचा प्रयत्न, शस्त्र बाळगणे,दुखापत,बदल्याची भावना,गैरकायदयाची मंडळी जमवणे,नुकसान करुन दहशत करणे,अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे विमानतळ,चंदननगर,मुंढवा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात केलेले आहेत.त्यांचेवर यापुर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करुन सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटित दहशतीचे मार्गाने स्वतःचे आर्थीक फायद्याकरीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने,तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने दाखल गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) चा अंतर्भाव करणेकामी मुंढवा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विष्णू ताम्हाणे यांनी मा.पोलीस उपायुक्त,परिमंडळ ५ पुणे शहर श्री.आर.राजा यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री,रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणी छाननी करुन मुंढवा पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर ३६२/२०२३ भादंवि कलम ३०७, ३२३,५०४,५०६,३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३), १३५ क्रिमीनल लॉ ॲमेन्डमेंट कलम ३,७ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणेचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री,रंजनकुमार शर्मा,यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,पुणे शहर,श्री.शाहुराव साळवे हे करत आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री.रामनाथ पोकळे,(अति.कार्यभार), मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परीमंडळ-५ पुणे शहर,श्री.आर.राजा, मा.सहा.पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे शहर,श्रीमती अश्विनी राख, त्यांचे मार्गर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुंढवा पोलीस स्टेशन श्री.विष्णू ताम्हाणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्रीमती सुनिता रोकडे, पो.उप निरीक्षक सदाशिव गायकवाड, सहा.पोलीस फौजदार,अभय काळे, पोलीस अंमलदार हेमंत झुरुंगे,ऋषिकेश टिळेकर, रविंद्र देवढे,वैभव मोरे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्यानंतर गुन्हेगारी नियंत्राणांवर बारकाईने लक्ष देवुन,शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल,यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत.**त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ११२ वी कारवाई आहे.**